Sanket Gaykhe

Page No.:
Date:

* दोष *

*** वातवृद्धी** → कार्श्य - काण्र्य - उष्णकामित्व - कंप - आनाह शकृतग्रहान
बल - निद्रा - इंद्रिय भ्रंश प्रलाप भ्रम दीनता:॥

*** वातक्षय** → लिंग - क्षीणे अनिले अंगस्याद अल्पभाषिते हितम ।
संज्ञामोहस्तथा श्लेष्मवृद्धी उक्तामयसंभव ॥

*** पित्तवृद्धी** → पीत - विण्मूत्र - नेत्र - त्वक क्षुतृट दाह अल्पानिद्रता ।

*** पित्तक्षय** → पीत्ते मन्दोऽनल: शीतं प्रभा हानि: ।

*** कफवृद्धी** → श्लेष्मा अग्निसदनं प्रसेकालस्य गौरवम ।
श्वैत्यशैत्य श्लथांगत्व श्वासकासातिनिद्रता ॥

*** कफक्षय** → कफे भ्रम: । श्लेष्माशयांना शुन्यत्वं हृद्रवं श्लथासाहिता ॥

* मल *

	वृद्धि	क्षय
① पुरीष (अवष्टंभ पुरीषस्य ।)	→ पोट फुगणे → पोटात गुडगुड आवाज → सार्वदेहिक स्वरूपात जडपणा व वेदना.	→ पार्श्वभागी पीडा उत्पन्न → गुडगुड आवाज → कुक्षीमध्ये फुगवटा → आंत्रामध्ये वेदना.
② मूत्र (मूत्रस्य क्लेदवाहनम् ।)	→ मूत्राशयात टोचल्याप्रमाणे वेदना → लघवी केली तरी न केल्यासारखी वाटणे. → मूत्रातील जलांशाचे प्रमाण वाढणे.	→ सकष्ट मूत्रप्रवृत्ती → मूत्रास विवर्णता प्राप्त. → मूत्राशयात वेदना. → अल्पमूत्रप्रवृत्ती → तोंडास कोरड पडते.
③ स्वेद → (स्वेदस्य क्लेदविधृति)	→ अतिघाम येणे → घामाला दुर्गंधी → अंगाला कंड सुटणे → अंग चिकट होणे → त्वचा सुकुमार होणे.	

Scanned with CamScanner

* धातु *

1] रसवृद्धी → रसो अतिवृद्धो हृदयं उत्क्लेदं प्रसेकं च आपादयति॥

रसक्षय → रसे रौक्ष्यं श्रम: शोषो ग्लानि शब्द असहिष्णुता।
रसक्षये हृत् पीडा कंप शून्यता तृष्णाच्य॥

2] रक्तवृद्धी → रक्त रक्तांग आक्षिता सिरापूर्णत्विच॥

रक्तक्षय → रक्ते अम्लशीशिर प्रीति: सिराशैथिल्य रुक्षता॥

3] मांसवृद्धी → मांस गंड, ओष्ठ, उरु बाहू जंघासु वृद्धि गुरुगात्रता च॥

मांसक्षय → मांसे अक्षग्लानि गंडस्फिक् शुष्कता संधिवेदना॥

4] मेदवृद्धी → मेद: स्निग्ध अङताम् उदर पार्श्ववृद्धि
कास श्वास आदीन दौर्गन्ध्यंच॥

मेदक्षय → मेदक्षये प्लीहावृद्धी संधिशून्यता।
रौक्ष्यं मेदूरमांसप्रार्थना च॥

5] आस्थिवृद्धी → आस्थि अधि- आस्थिनी अधिदंताच:॥

आस्थिक्षय → आस्थि क्षये आस्थिशूलं दंतनखो भंगो रौक्ष्यंच॥

6] मज्जावृद्धी → मज्जा सर्वांग नेत्र गौरवम्॥

मज्जाक्षय → अस्थ्नां मज्जानि सौषिर्य भ्रम तिमिरदर्शनम्॥

7] शुक्रवृद्धी → अति स्त्री कामतां वृद्ध शुक्राश्मरीम् अपि॥

शुक्रक्षय → शुक्रे चिरात् प्रासिच्येत् शुक्रं शोणितम् एव वा॥

Scanned with CamScanner

* दोषधातु आश्रयाश्रयीभाव →

① वात → अस्थि

② पित्त → रक्त, स्वेद

③ कफ → रस, मांस, मेद, मज्जा, शुक्र, मूत्र, पुरीष

※ दोषप्रकोप हेतु →

① वातप्रकोपक →

(i) आहार → कटु, तिक्त, कषाय रसांनी युक्त
रुक्ष, लघु, शीत गुणांनी युक्त.

(ii) विहार → वेग धारण करणे
आपल्या शक्तीपेक्षा अधिक श्रमाचे काम करणे.

(iii) मानसिक कारणे → चिंता, भय, कामाचा सतत ताण.

(iv) आहाराचे नियम मोडणे → लंघन
→ अल्प आहार घेणे
→ आहारात धातुपोषक अंश कमी असणे.
→ अवेळी जास्त खाणे.

(vi) साक्षात धातुक्षय करणारी कारणे → पंचकर्माचा अतियोग
→ रसरक्तस्राव
→ अतिमैथुन इ.

चय → स्तब्धपूर्ण कोष्ठता निर्माण झाल्याची
उदर पूर्ण भरल्याची भावना.

ऋतु	
शिशिर, वसंत, ग्रीष्म	कफ
ग्रीष्म, वर्षा, शरद	वात
वर्षा, शरद, हेमंत	पित्त

वात - उतारवय - रात्र - नाभीच्या खाली → last stage
पित्त - तरुणवय - मध्यरात्र - नाभी हृदय मध्ये → mid stage
कफ - बालवय - सकाळ - हृदयाच्या वरील भाग → starting
} अ… पारि

वात → रूक्षादि गुण —चय→ उष्णयुक्त
↓ प्रकोप ↕ प्रशम
शीतयुक्त स्निग्धादी गुण

पित्त → तीक्ष्णादी गुण —चय→ शीतयुक्त
↓ प्रकोप ↕ प्रशम
उष्णयुक्त मंदादि गुण

कफ → स्निग्धादि गुण —चय→ शीतयुक्त
↓ प्रकोप ↑ प्रशम
उष्णयुक्त रूक्षादी गुण

(2) पित्त प्रकोप हेतु

(i) पित्त प्रकोपक आहार - रस → कटू, लवण
गुण → उष्ण, लघु, विदाही इ.

(ii) मानसिक कारणे - क्रोध, शोक इ.

(iii) विहार → उष्णतेजवळ सतत काम करणे
→ उन्हात हिंडणे → रात्री जागरण
→ क्ष-किरण यंत्राजवळ काम → उपवास.

(3) कफप्रकोप हेतु →

(i) आहार → रस - मधुर, अम्ल, लवण
गुण → स्निग्ध, शीत, गुरु, मन्द इ.

(ii) विहार → आळसाने बसून राहणे
→ बैठा व्यवसाय
→ दिवसा झोपणे इ.

Scanned with CamScanner

* अग्नी *

* **हेतु** →
① भोजन न करणे, अतिभोजन
② अजीर्ण असणे
③ पंचकर्माचा अतियोग, मिथ्यायोग
④ अति गुरु, शीत, दुष्ट भोजन
⑤ देश, काल, ऋतु यातील वैषम्य.

* **अग्नी दुषित होण्याची कारणे** →

① हेतु
② दोषांची साम्यावस्था व अग्नीची प्राकृतावस्था एकमेकांवर अवलंबून आहे.
③ अग्नी ज्या स्थानात असतो त्या ग्रहणी या अवयवाची दुष्टी झाल्यानेही अग्नी दुषित होऊ शकतो.
④ मानसिक हेतु

	दोष		अग्नी
①	वात	→	विषमाग्नी
②	पित्त	→	तीक्ष्णाग्नी
③	कफ	→	मंदाग्नी
④	समदोष	→	समाग्नी

Scanned with CamScanner

SANKET GAYKHE

* आम *

* **व्याख्या** :→ आम हा शब्दच अपक्वता दर्शवितो

→ विकृत शारीरक्रियाव्यापारांमुळे शरीरामध्ये आम या विषसमान द्रव्याची उत्पत्ती होते.

→ अग्निमांद्यामुळे आहाराचे सम्यक् पचन न झाल्यास आहाररसाचे स्वरूप अपक्व राहते. या अपक्व आहाररसामुळे शरीराला बाधाकर संघटन तयार होते. यालाच आम म्हणतात.

* **आमोत्पत्ती स्वरूप** → ① जाठराग्निमांद्यामुळे आमोत्पत्ती
  - ② धात्वाग्निमांद्यामुळे
  - ③ दोषदूष्यसंमूर्च्छनेमुळे
  - ④ कृमिविषामुळे
  - ⑤ मलसंचयामुळे

① जाठराग्निमांद्यामुळे आमोत्पत्ती →

- आद्यधातू - आहाररस
- मंदाग्नीमुळे तो अपक्व राहतो व दुष्ट होतो.
- अपक्व आहाररस निर्मितीचे स्थान → आमाशय
  → ग्रहणी.
- आमाची उत्पत्ती झाली याचाच अर्थ प्राकृत रसाचे शरीरपोषण व प्रीणन हे कार्य व्यवस्थित होत नाही, हालचालींना जडत्व येते ही लक्षणे उत्पन्न.

② धात्वाग्निमांद्यामुळे आमोत्पत्ती

धात्वाग्नीच्या मंदतेमुळे त्या त्या धातूचे अपाचित स्वरूपाचे घटक शरीरात जमा होऊ लागतात त्याला आम म्हणतात.
उदा. मेद.

③ दोषदूष्यसंमूर्च्छनेमुळे आमोत्पत्ती :

- दुष्ट दोषांच्या अन्योन्यमूर्च्छनेमुळे आमोत्पत्ती
- त्रिदोषांचा सर्व शरीरात संचार होत असल्याने आमोत्पत्ती शरीरात कोठेही होईल.
- संमूर्च्छना म्हणजे नुसतेच एकत्रिकरण नाही तर त्या दोषांच्या मिश्रणातून एक वेगळाच पदार्थ निर्माण होतो.
- द्विदोषज व सान्निपातिक व्याधींमध्ये भाग घेणारे दोष बलवान असतील तर संमूर्च्छना होऊन आम उत्पन्न

④ कृमिविषामुळे आमोत्पत्ती -

- कृमींचा शरीरात प्रवेश झाला असताना शरीराचे किंवा त्या त्या धातूंचे व्याधिक्षमत्व उत्तम असेल तर कृमींच्या संपर्कामुळे कोणतीच बाधा होणार नाही.
- परंतु व्याधिक्षमत्व नसल्यास किंवा कमी झाल्यास कृमी विशिष्ट स्थानी स्थानसंश्रय करतात. व त्यांच्यामुळे शरीरात एकप्रकारचे विषद्रव्य तयार होते.
- प्रथम धातुदुष्टी, नंतर दोषदुष्टी.

⑤ मलसंचयामुळे आमोत्पत्ती :

- शरीरात एका धातूपासून दुसऱ्या धातूची उत्पत्ती व धातूंचा क्षय ही प्रक्रिया नेहमी चालू.
- अशा वेळी जो सूक्ष्म मल उत्पन्न होतो. त्याचे योग्य तऱ्हेने वहन होऊन शरीराबाहेर विसर्जन झाले नाही तर अशा साचलेल्या मलसंचयापासून आमाची उत्पत्ती

* आमोत्पत्तीची कारणे

* आमाची लक्षणे →

① स्रोतोरोध - स्रोतसांतील भावपदार्थांच्या वहनाला अडथळा उत्पन्न.

② बलभ्रंश - मांसधातूचे लेपनकार्य योग्य असूनही आकुंचन-प्रसरण या स्वरूपाची हालचाल करता येत नाही. बल कमावते

③ गौरव - शरीराला स्वतःचेच अवयव बोजड वाटू लागतात.

④ अनिलमूढता - निरनिराळ्या स्रोतोरोधाने वायूच्या प्राकृत अनुलोम गतीला अडथळा. त्यामुळे प्राकृत हालचाली स्थगित

⑤ आलस्य - बाह्यतः शरीर सुस्थितीत असूनही शरीराकडून कोणतेच कार्य केले जात नाही.

⑥ अपक्ती - शरीरातील निरनिराळे भावपदार्थ योग्य स्वरूपात पक्व स्वरूपात तयार होत नाही.

⑦ मलसंग - त्या त्या स्थानातील उत्सृष्टभाग साठून राहतात.

⑧ अरूची - ज्ञानेंद्रियांना त्यांचे कार्य करू नये अशी जाणीव

⑨ क्लम - संपूर्ण शरीर गळून गेल्याप्रमाणे वाटते.

Scanned with CamScanner

* साम - निराम *

सामवायु
(आमाने उत्पन्न केलेला अवरोध)

1. मल मूत्रादीचा संग
2. अग्निमांद्य
3. पोटात गुडगुडणे, शूल इ वेदना उत्पन्न.
4. सूज येणे
5. विमार्गगमन - आमाने स्रोतोरोध केल्यामुळे वायुच्या प्राकृत गतीला अडथळा.
6. स्नेहादि उपचार

निरामवायु
(नष्ट)

1. आमाने निर्माण केलेला अवरोध नष्ट. - निर्विबंध
2. विशदता उत्पन्न करणारा
3. वेदना कमी होतात.
4. वायूच्या प्रेरणेने मलरूप घटक त्या स्थानातून बाजूला उत्सर्जनमार्गाकडे नेले जातात.
5. रूक्ष, उष्ण उपचार.

सामपित्त (आम+पित्त)

1. वर्ण - हिरवा, काळा, निळा
2. रस - अम्ल
3. गुण - स्थिर, गुरु
4. दुर्गंधी येते
5. घशात, छातीत, जळजळ उत्पन्न करते.
6. मधुर, शीत गुणांची योजना.

निरामपित्त

1. वर्ण - पिवळसर, लालसर.
2. रस - कटू
3. गुण - उष्ण, सर.
4. दुर्गंधी येत नाही.
5. रुची उत्पन्न करते.

सामकफ (साम+कफ)

1. स्वरूप गढूळ वर्णाचे असते.
2. आमाच्या बहुपिच्छिल गुणामुळे चिकटपणा उत्पन्न करतो.
3. थुंकून टाकायचा प्रयत्न केल्यास तार येते
4. दुर्गंधीयुक्त असतो.
5. भूक नीट लागत नाही.
6. शुद्ध ढेकर येत नाही.

निरामकफ [कफ-आम]

1. आशयाला चिकटून बसण्याचा गुणधर्म नष्ट.
2. फेसयुक्त, आशयातून चटकन सुटणारा मकम होणारा बनतो.
3. दुर्गंधी नष्ट
4. ऊर्ध्वमार्गाने बाहेर पडला तर मुखाची शुद्धी करतो.
5. स्रोतोमुखाची शुद्धी करतो

Scanned with CamScanner

* साम-निरामदुष्य लक्षणे

① स्रोतोरोध -
② बलभ्रंश
③ आलस्य
④ गौरव
⑤ अनिलमूढता
⑥ मलसंग
⑦ क्लम

* साम-मलांची लक्षणे → निराम मल यांच्या विरुद्ध

① पुरीष → गुरु, दुर्गंधित, प्रभूत, शिथिल व द्रव स्वरूपाचे
→ जलामध्ये टाकल्यास सामपुरीष बुडते.
→

② मूत्र → विस्रगंधी, आविल, सांद्र

* साम व्याधींची लक्षणे

① वातप्रधान → आमाने मार्गविरोध झाल्यामुळे असतो.
→ तीव्र वेदना, शूल, अंगमर्द इ. लक्षणे.
→ स्नेहनाने लक्षणे वाढणे.
→ हिक्का, भ्रम, मूर्च्छा, सन्यास इ. लक्षणे.

② पित्तप्रधान → तीव्र ज्वर
→ अग्निवैषम्य
→ दाह, राग, प्रलाप, भ्रम, मूर्च्छा इ.

③ कफप्रधान → प्रसेक, आलस्य, गौरवम्, छर्दि इ.
→ अग्निमांद्य
→ अरोचक
→ अविपाक

Scanned with CamScanner

* दोषपाक → विकृति विज्ञानात या अवस्थेच्या ज्ञानाला महत्त्व.
① दोषपाक घडवून आणण्यासाठी प्रामुख्याने शरीरातील अग्नीचे बल वाढविणे व दोषांचे पाचन करणारी अन्य चिकित्सा करणे महत्वाचे.
② दोषांची तीव्रता कमी असेल तर या चिकित्सेचा शमनार्थ उपयोग होतो. व दोष त्याच ठिकाणी पचन होऊन नाहीसे होतात.

लक्षणे →
① संप्राप्तीमध्ये ज्या दोषांच्या प्राबल्याची लक्षणे दिसत असतात ती कमी होतात.
② ज्वर लक्षण असल्यास त्याची तीव्रता कमी होत जाते.
③ धातुपाकावस्थेत शरीरात गौरव वाढत जाते. तर दोषपाकात विकृतभागी मोकळेपणा, हलकेपणा पीडा कमी झाल्याची संवेदना जाणवू लागते.
④ इंद्रियांची स्वविषय ग्रहण करण्याची इच्छा नष्ट झालेली असते. त्यात स्वास्थ्य वाटत नसते. ही अवस्था जाऊन इंद्रिये पुन्हा स्वस्थीत होऊ लागतात. व विषय ग्रहण करु लागतात.

* धातुपाक → दुष्ट झालेले वात-पित्त-कफ धातूंना दुषित करतात त्याला धातुपाक म्हणतात.
→ दोषप्रकोपाच्या अगदी विरुद्ध अवस्था.
→ धातुपाकावस्थेत दोषांचे विकृत कार्य सुरु होऊन धातूंचेच पचन केले जाते.

लक्षणे →
① झोप न लागणे.
② छातीत अथवा हृदयाच्या भागी जळल्याप्रमाणे वाटणे
③ तीव्र मलावरोध
④ शरीरात जडपणा उत्पन्न होणे.
⑤ कोणत्याही गोष्टीत नैराश्य, झपाट्याने शक्ती नाहीशी
⑥ वजन कमी होते.

वरील लक्षणे जिथे तेथे रोगाने गंभीर स्वरुप धारण केले ~~असे समजावे~~ व शरीरात धातूंचे पचन सुरु झाले असून धातू क्रमाक्रमाने नष्ट होत आहे असे समजावे.

Scanned with CamScanner

दोषांच्या शरीरातील विविध अवस्था

* दोषगती *

- द्विविध गति
  - प्राकृती
  - विकृती
- त्रिविध गति
  - ① वृद्धी ② क्षय ③ स्थान
  - ① ऊर्ध्व : ② अध : } कोष्ठ ③ तिर्यक्-शाखा
  - ① कोष्ठ ② शाखा ③ मर्मास्थिसंधी
- कालकृत गती
  - ऋतूनुसार दोषांचा चय, प्रकोप व प्रशम

* रोगमार्ग / व्याधीमार्ग →

① कोष्ठगती → कोष्ठमार्ग → सुखसाध्य व्याधी

② शाखागती → शाखामार्ग → व्याधी बरा करणे अधिक अवघड

③ मर्मास्थिसंधी → मध्यममार्ग → यांना इजा होण्याची भिती त्यामुळे सर्वात अवघड चिकित्सा

① कोष्ठमार्ग - कोष्ठगती → दोष कोष्ठातच जमलेले असतील किंवा शाखांमधून सुटून कोष्ठात येत असतील तर त्याला कोष्ठगती म्हणावे

कोष्ठाश्रित व्याधी → ① आध्मान ② अलसक ③ अजीर्ण ④ अग्निमांद्य ⑤ अम्लपित्त ⑥ ग्रहणी इ.

२ गट → ① दोष मुख्यत: कोष्ठातच संचित होऊन उत्पन्न होणारे व्याधी → (i) छर्दी (ii) अजीर्ण (iii) अम्लपित्त (iv) अलसक (v) विसूचिका

→ यावर चिकित्सा करताना दोष कोष्ठात आणण्याचे प्रयत्न फार करावे लागत नाही.

→ मुख किंवा गुदमार्गाने त्यांचे निर्हरण

→ स्रोतोरोधाने मुख बंद झाल्यामुळे मुख विवृत करून किंवा उत्पन्न करून त्यांचे निर्हरण करता येते

② दोष प्रथम शाखामार्गातून कोष्ठात आणावे लागतात
व्याधी (i) ज्वर (ii) छर्दी (iii) कास
(iv) श्वास (v) विसर्प.

② शाखामार्ग - शाखागती → प्राधान्य रक्त, मांस व मेद धातू

अ] दोषदुष्टीत कफाचे प्राधान्य असल्यास
1) असे दोष स्रोतसांच्या भिंतींना चिकटून बसतात व उपलेप ही विकृती निर्माण करून व्याधी उत्पन्न.
2) कफाच्या श्लेषक गुणाने विकृत घनसंघात उत्पन्न
उदा गुल्म, शोथ

ब] दोषदुष्टीत पित्ताचे प्राधान्य असल्यास
1) कोष्ठाच्या आवरणरूप शाखेचा पाक होतो → व्रणशोथ
2) पित्ताच्या उष्ण-तीक्ष्ण गुणांमुळे कोष्ठावरण करणाऱ्या शाखेचे भेदन होऊन कोष्ठाश्रित पदार्थ शाखेकडील बाजूला जाऊ लागतो.
उदा. नासा, अन्न, मूत्रमार्गातून होणारा रक्तस्राव.

क] दोषदुष्टीत वाताचे प्राधान्य असल्यास
1) वातदोषाला स्वतःचे कार्य शाखांच्या आधारेच व्यक्त करावे लागतात.
② वाताचा चल गुण वाढू लागला तर कोष्ठातून वाहणाऱ्या प्रवाहाचा वेग वाढतो.
आवरणाचे स्पंदन वाढते व त्याचा विस्तार होऊन शाखा - आवरण पातळ होते व कोष्ठभाग वाढतो
यालाच विकृती म्हणतात.

③ मध्यममार्ग - मर्मास्थिसंधि

धातु प्राधान्य - अस्थि, मज्जा, शुक्र

मर्मस्थाने - शिर, हृदय, वृक्क इ.

मध्यममार्गाश्रित व्याधी → शाखाश्रित दोष सुखाने नजीकच्या कोष्ठात आणणे व निर्हरण करणे सोपे नसते

* दोषगती व व्याधीमार्ग ज्ञानाचे महत्त्व →

* दोष कोष्ठातून शाखात जाण्याची कारणे

① व्यायामाचे परिणाम
② अग्नीच्या उष्ण-तीक्ष्ण गुणांचे परिणाम
③ अहिताचरणाचे परिणाम
④ वायूचे द्रुतत्व - वायूचा तीव्र वेग

* दोष कोष्ठात आणण्याचे उपाय →

① स्रोतोमुखविशोधन
② वृद्धी
③ अभिष्यंद - द्रवीभाव
④ पाक (पचन)
⑤ वायूचा निग्रह - वायूची प्रेरणाशक्ती

Scanned with CamScanner

※ परीक्षा विज्ञान ※

※ त्रिविध प्रशिक्षा → दर्शनस्पर्शनप्रश्नैः परिक्षेताथ रोगिणाम् ।
① दर्शन
② स्पर्शन
③ प्रश्न

① दर्शन परिक्षा → स्थूलता, कृशता, आयु, रोग्याचे लक्षण
रोग्याचे बल, वर्ण याचे ज्ञान.
सर्वाधिक वर्णाचे ज्ञान.

② स्पर्शन परिक्षा → हात/बोटांच्या स्पर्शाद्वारे परिक्षण.
शीत-उष्ण, मृदू-कठीण इ. ज्ञान.

③ प्रश्न परिक्षा → चिकित्सक रुग्णाला प्रश्न विचारून जी माहिती प्राप्त करतो ते.
देश, काल, जाती, वात-मूत्र-मलाची प्रवृत्ती, अप्रवृत्ती इ. ज्ञान.

※ पंचविध परिक्षा → ① चक्षुरेंद्रिय - दर्शन
② त्वचेंद्रिय - स्पर्शन.
③ श्रोत्रेंद्रिय
प्रमेह ← ④ घ्राणेंद्रिय - रसाचे ज्ञान गंध ज्ञान.
मधुमेही रुग्ण ← ⑤ रसनेंद्रिय - रसाचे ज्ञान - अनुमानाद्वारे परिक्षा

※ षड्विध परिक्षा → ⑤ पंचविध परिक्षा
⑥ प्रश्न परिक्षा.

Scanned with CamScanner

Page No.:
Date: / /

※ अष्टविध परिक्षा :-

सर्वप्रथम परिक्षा
- ① नाडी ⑤ शब्द
- ② मूत्र ⑥ स्पर्श
- ③ मल ⑦ नेत्र
- ④ जिव्हा ⑧ आकृती.

① **नाडी परिक्षा** → रुग्णाच्या उजव्या हाताच्या अंगुष्ठमूलस्थान असलेल्या नाडीचे परिक्षण वैद्याने स्वतःच्या उजव्या हाताने करावे.
→ एकाग्रचित्ताने नाडीचे परिक्षण करावे.

* **नाडी परिक्षण पद्धती** →
स्त्री → डावा हात
पुरुष → उजवा हात.

3 वेळा परिक्षण
हाताचा पंजा आकाशाच्या दिशेने. बोटे पसरलेली.

* **नाडी परिक्षण काल** → प्रातः काळी । प्रहर (45 मिनिटे) काळापर्यंत करावे.

* **नाडी परिक्षण अनार्ह** → स्नान केल्यानंतर लगेच
→ भोजन केल्यानंतर लगेच.
→ स्नेहन केल्यानंतर
→ भूक लागलेली असताना
→ रुग्ण झोपलेला असताना
→ झोपेतून उठल्यावर लगेच.

Scanned with CamScanner

* नाडी परिक्षा व दोष विचार →

→ ३ अंगुलींद्वारे नाडीचे परिक्षण करावे
(अनामिका , मध्यमा , तर्जनी)

→ क्रमानुसार वात , पित्त व कफ दोष तसेच नाडीच्या मंद , मध्य व तीक्ष्ण गती यांद्वारे दोषांच्या संबंधाने अनुमान लावावे.

→ अग्रभागी वाताचे वहन
मध्यभागी पित्ताचे वहन
शेवटी कफाचे वहन करणाऱ्या नाडीचे ग्रहण.

दोष		नाडी गती
वात	-	सर्प
पित्त	-	मण्डूक
कफ	-	हंस
वात-पित्त	-	सर्प, मण्डूक
वात-कफ	-	सर्प, हंस
पित्त-कफज	-	मण्डूक, हंस
सान्निपातिक	-	सुतार पक्ष्याप्रमाणे

* असाध्य नाडी गती

→ जी नाडी एका विशिष्ट गतीने ३० वेळा चालते
→ व त्यानंतर स्वस्थानावर मंद होऊन जाते.
→ जी नाडी मंद-मंद , चंचल-चंचल , दुर्बल - दुर्बल , सूक्ष्म - सूक्ष्म चालते ती असाध्य

* मृत्यूसूचक नाडी गती

जी नाडी गती थांबून थांबून चालते. ती प्राणघातक

Scanned with CamScanner

* अन्य लक्षणे :→

1. मांसवाही नाडी - नाडीची गती गंभीर
2. ज्वर - वेगवान, उष्ण
3. क्रोधावस्थेत - वेगवान
4. चिंता व भय अवस्थेत → क्षीण
5. मंदाग्नी व धातुक्षीण → मंद
6. रक्तपूर्ण नाडी - उष्ण व गंभीर.

* नाडी गती व ज्वरावस्था

ज्वर		नाडी गती
वात	-	चपळ
शीतापित्त ज्वर	-	सरळ व दीर्घ गती
कफज	-	मंद, स्थिर, शीतल, स्निग्ध
वात पित्तज	-	मंद
पित्त कफज	-	दुर्बल

* आरोग्यसूचक नाडी

हंस गती }
गज गती } गंभीर गती असणारी व प्रसन्नचित्त रुग्ण असलेली नाडी.

* नाडी परिक्षणाचे महत्त्व → जीवसाक्षिणी

→ व्याधीचे प्रत्यक्ष ज्ञान वैद्याला करून देणा

→ नाडी गतीवरून रुग्णाच्या सुःखदुःखाचे अर्थात रोगी अवस्थेचे ज्ञान प्राप्त होते

→ नाडी परिक्षणाने वातादि त्रिदोष, सान्निपात यांचे ज्ञान प्राप्त.

* नाडी गती व देवता

वातदोष → ब्रह्म
कफ पित्त → शंकर
कफ → विष्णू.

* मूत्रपरीक्षा → सूर्योदयाच्या १ तास आधी उठवावे.
स्वच्छ पारदर्शक काचपात्रात मूत्रसंग्रह.
मूत्राची प्रथम व अंतिम धार सोडून मूत्र परीक्षणार्थ
प्रथम धारेत मूत्राची विकृती } शक्यता
अंत धारेत मूत्राशयाच्या तळाशी गाळ
मध्य धारेचे मूत्र संग्रहणार्थ

आयुर्वेदीय पद्धतीने मूत्रपरीक्षा →

1) स्पर्श → उष्ण
2) वर्ण → अल्प पीताभ
3) गंध → दुर्गंधित. साम ✓ निराम X
4) प्रमाण → ४ अंजली

तैलबिंदू परिक्षा विधी



① तेल पसरते → साध्य व्याधी
② तेल पसरत नाही → कष्टसाध्य
③ तेल बुडते → असाध्य

① तैलबिंदू सर्पाकार - वात
छत्राकार - पित्त
मुक्ताकार - कफ



वर्ण	दोषाधिक्य
पाण्डुर →	वात
रक्त →	पित्त
श्वेत →	कफ
कृष्ण →	सान्निपातज

* **मलपरिक्षा** →

	वर्ण
वात	ग्रथित, शुष्क
पित्त	पीताभ
कफ	श्वेत

दोष प्राधान्य	मल - विशेष
वात-कफ	ईषत् कृष्ण वर्ण
वात-पित्त	पीत, श्याव वर्णीय
कफ-पित्त	पीत, श्वेत वर्णीय
त्रिदोष	श्याव, पीताभ, श्वेत

जीर्णमल → सदुर्गंध, शीतल मल प्रवृत्ती

व्याधी	मलविशेष
जलोदर	श्वेतवर्णीय, सदुर्गंध
क्षय	कृष्णवर्णीय
आमदोष	पीतवर्णीय, कटिशूलासह मलप्रवृत्ती

अग्नी	मलविशेष
तीक्ष्णाग्नी	ग्रथित, शुष्क
मंदाग्नी	द्रवमल प्रवृत्ती.

अत्यंत दुर्गंधीयुक्त व चंद्रिकायुक्त मललक्षण - असाध्य.

(4) **शब्दपरिक्षा** →

	स्वर
वात	लक्षणाविरहित
पित्त	स्फुट
कफ	गुरु

मूक - मुका
मिनमीनत्व - सानुनासिक
गदगद - अडखळत बोलणे

* **स्पर्श परीक्षा** →

	स्पर्श
वात	शीत
पित्त	उष्ण
कफ	आर्द्र

* **दृक् परिक्षा** →

प्रकृति	गुण
वात →	अरुण, नील, रूक्ष, चंचल, अंतप्रविष्ट, धूम्र
पित्त →	रक्त, हारिद्र, मलिन, तीक्ष्ण, दाहयुक्त
कफ →	श्वेत, धवल, प्लुत, स्निग्ध, स्थिर

* **जिव्हा परिक्षा**

SAQ IMP

वात - स्फुटित, खर, शीत जिव्हा
पित्त - रक्त व कृष्णवर्णाची जिव्हा
कफ - पिच्छिल व श्वेतवर्णीय जिव्हा

* रूप परीक्षा / आकृती

SAQ//

* कारणादी दशविध परिक्ष्य भाव →

वैद्य ← कर्ता ←	① कारण	⑥ अनुबन्ध →	चिकित्सेने दीर्घायुष्य व्याधीच्या सुयोग्य
कार्याचे साधन ←	② करण	⑦ देश →	शरीराचा व्याधीग्रस्त प्रदेश
चिकित्सा ←	③ कार्य	⑧ काल →	सर्व काल
कार्याचे मूळ ←	④ कार्ययोनि	⑨ प्रवृत्ती →	चिकित्सेचे चतुष्पाद
कृतीचे फळ ←	⑤ कार्यफल	⑩ उपाय →	वैद्यांचे उपाय

* दशविध परिक्षा →

1. प्रकृती
2. विकृती
3. सारता
4. संहनन
5. ← प्रमाण
6. सात्म्य
7. सत्व
8. आहारशक्ती
9. व्यायामशक्ती
10. वय

* दशविध परिक्ष्य भाव

1. दूष्य
2. देश
3. काल
4. बल
5. अग्नी
6. प्रवृती
7. वय
8. सत्व
9. सात्म्य
10. आहार.

* त्रिविध परिक्षा / त्रिविध प्रमाण

1. प्रत्यक्ष
2. अनुमान + (युक्ती) → चतुर्विध परिक्षा
3. आप्तोपदेश

Page No.:
Date: / /

* त्रिविध हेतु / निदान

① असात्मेंद्रियार्थसंयोग
② प्रज्ञापराध
③ परिणाम

① असात्मेंद्रियार्थसंयोग →

इंद्रियांना न सोसणाऱ्या, पीडाकर होणाऱ्या विषयाच्या संबंध इंद्रियांशी घडणे म्हणजेच शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पाचही विषयांचा त्यांच्या इंद्रियांशी होणारा ① संयोग →
② अतियोग → जास्त प्रमाणात संबंध
③ अयोग → इंद्रिय कार्यक्षम असूनही विषयांशी संपर्क न येणे.
④ मिथ्यायोग → विकृत रीतीने इंद्रिय व विषय यांचा संबंध येणे

① श्रोत्रेंद्रिय - शब्द
② चक्षुरेंद्रिय - स्पर्श
③ स्पर्शनेंद्रिय - रूप
④ रसनेंद्रिय - रस
⑤ घ्राणेंद्रिय - गंध

→ हीनयोग
→ अतियोग
→ मिथ्यायोग

② प्रज्ञापराध →

① धी → योग्य-अयोग्य, चूक-बरोबर याचे ज्ञान
② धृती → त्या निर्णयानुसार हितकर योग्य आचरण करण्याची मनाची तयारी.
③ स्मृती → आचरण सातत्याने टिकवण्यासाठी पूर्वी घेतलेल्या योग्य- अयोग्यतेच्या निर्णयाचे सतत स्मरण राहणे होय

प्रज्ञेवर रज व तमोगुणांचे प्राबल्य उत्पन्न होते व प्रज्ञा मोहग्रस्त बनून प्रज्ञापराध होतात.
① धी- भ्रंश
② धृतिभ्रंश
③ स्मृतिभ्रंश

③ परिणाम →

परिणाम म्हणजे काल
→ कालप्रभाव हे महत्त्वाचे रोग कारण आहे.
→ असात्मेंद्रियार्थसंयोग योग्य आचरणाने टाळता येईल
– प्रज्ञापराध मन संयोगाने व सात्विक आचरणाने)
परंतु कालाशी प्रत्येक मनुष्याचा संबंध अटळ असतो काल हा निष्प्रत्यनिक आहे. त्याचा प्रतिकार करता येते नाही
ऋतू, दिवस, रात्र यांचे परिणाम.

Scanned with CamScanner

* व्याधि विज्ञान *

Date. / /

* व्याधी →

① व्याख्या → दोषवृद्धीमुळे शरीरात घडून येणाऱ्या चय, प्रकोप, प्रसर, स्थानसंश्रय, व्यक्ती व भेद या अवस्था परिपूर्ण झाल्या म्हणजे व्याधी उत्पन्न होतो.

वैद्यकाच्या दृष्टीने उपयोगी व्याख्या → दोष व दूष्य यांच्या संमूर्च्छनेतून, एकत्रीभवनातून परस्पर संपर्कातून जो विशेष प्रकारचा लक्षण - समुच्चय उत्पन्न होतो त्याला व्याधि म्हणावे.

सुख → आरोग्य → स्वास्थ्य
दुःख → विकार → व्याधी

② पर्याय → ① व्याधी
② ज्वर
③ विकार
④ दुःख

③ व्याधीचे दोषमूलकत्व → दोष हे व्याधीचे मूल कारण

ⓐ लक्षणे → ① वात - वेदना - वातघ्न ← ⓑ चिकित्सा
② पित्त - दाह - पित्तघ्न -
③ कफ - गौरव - कफघ्न

ⓒ दोषांचा धातू व मलांशी संपर्क.

④ व्याधी व दोष यांचा कार्यकारण संबंध -
प्रकुपित दोष - व्याधीचे कारण
व्याधी - कार्य

Page No.
Date / /

* व्याधीचे प्रकार →

• द्विविध भेद →

① प्रभाव भेद	② बल भेद	③ अधिष्ठान भेद
साध्य	मृदू	शारीर
असाध्य	दारुण	मानस

④ हेतुभेद	⑤ आशयभेद	⑥ हेतुभेद
स्वधातु वैषम्य	आमाशयोत्थ	निज
आगन्तुक	पक्वाशयोत्थ	आगन्तु

⑦ स्वभाव भेद	⑧ अवस्थाभेद	⑨ दोषानुसार
उत्तान	साम	सामान्यज
गंभीर	निराम	नानात्मज

⑩ क्रियाभेद	⑪	⑫
औषधसाध्य	संतर्पणोत्थ	अनुबंध्य - स्वतंत्र
क्रियासाध्य	अपतर्पणोत्थ	अनुबंध - परतंत्र

• त्रिविध भेद

① कारण भेद	② मार्गभेद	③ साध्यासाध्यतेनुसार
निज	शाखाश्रित	साध्य
आगन्तुज	कोष्ठाश्रित	याप्य
मानस	मध्यम	असाध्य

④ दोषप्रकारानुसार	⑤ सुश्रुतोक्त वर्गीकरण
आग्नेय	आध्यात्मिक
सौम्य	आधिभौतिक
वायव्य	आधिदैविक

एकदोषज
द्विदोषज
सान्निपातिक

Scanned with CamScanner

निदान भेद

- चार भेद
  1. वातज
  2. पित्तज
  3. कफज
  4. आगन्तुज

साध्यासाध्यता भेद

1. सुखसाध्य
2. कृच्छ्रसाध्य
3. याप्य
4. असाध्य

- सप्तविध भेद

वाग्भटानुसार

1. सहज
2. गर्भज
3. जातज
4. कालज
5. पीडाजन्य
6. प्रभावज
7. स्वभावज

सुश्रुतानुसार

1. आदिबलप्रवृत्त रोग
2. जन्मबलप्रवृत्त रोग
3. दोषबलप्रवृत्त रोग

} आध्यात्मिक

4. ~~कालब~~ संघातबलप्रवृत्त रोग - आधिभौतिक

5. कालबलप्रवृत्त रोग
6. दैवबलप्रवृत्त रोग
7. स्वभावबल प्रवृत्त रोग

} आधिदैविक

Scanned with CamScanner

* अष्टौमहागद संकल्पना *

महागद म्हणजे महारोग म्हणजे गंभीर आजार

हे आजार असाध्य अथवा अतिशय कष्टसाध्य असून त्यांच्यामुळे मरणदेखील येऊ शकते म्हणून त्यांना महागद म्हणतात

	चरक		सुश्रुत	वाग्भट
V	① वातव्याधी	V	वातव्याधी	वातव्याधी
A	② अपस्मार	A	अश्मरी	अश्मरी
K	③ कुष्ठ	K	कुष्ठ	कुष्ठ
M	④ मधुमेह	P	प्रमेह	प्रमेह
U	⑤ उदर	U	उदर	उदर
S	⑥ शोथ	B	भगंदर	भगंदर
R	⑦ राजयक्ष्मा	A	अर्श	अर्श
G	⑧ गुल्म	M	मूढगर्भ	ग्रहणी

* अष्टौनिंदितांमधील दुर्बलत्व → आत्याहिकमत्व *

8 प्रकार

① अतिस्थूल - अत्यंत जाडा	} मांसमेद → शोषन	
② अतिकृश - अत्यंत बारीक		
③ अति ह्रस्व - कमी उंचीचा	} आस्थि → धातू	
④ अति दीर्घ - जास्त उंचीचा		
⑤ अति लोम - अत्यंत केस	} आस्थिधातू मल	
⑥ अलोम - कमी केस		
⑦ अति कृष्ण - अत्यंत काळा	} रक्त.	
⑧ अति गौर - अत्यंत गोरा.		

५७/ व्याधीक्षमत्व (Immunity)

- **व्याख्या** - व्याधिहेतूंचा / कारणांचा शरीराशी संबंध आल्यानंतर शरीरात विकृती / व्याधी उत्पन्न करण्याकडे त्यांचा कल असतो. परंतु शरीराचा त्याच वेळी व्याधी उत्पन्न होऊ न देण्याकडे प्रयत्न सुरु होतो. यामध्ये शरीराचा हा जो व्याधीविरोधी प्रयत्न कार्य करीत असतो, त्यालाच व्याधिक्षमत्व म्हणतात.

'व्याधिक्षमत्वं नाम व्याधिबलविरोधित्वं व्याध्युत्पादप्रतिबंधकत्वमिति'
—(चक्रपाणि)

- **व्याधिक्षमत्व प्रकार-**

व्याधिक्षमत्व
- स्वाभाविक (Natural)
  - जाति स्वाभाविक
  - कुल स्वाभाविक
  - व्यक्ति स्वाभाविक
- अभ्यासज (Acquired)
  - सक्रिय (Active)
    - सहज (Natural)
    - कृत्रिम (Artificial)
  - निष्क्रिय (Passive)
    - सहज
    - कृत्रिम

A]. स्वाभाविक व्या. (Natural)

→ आनुवांशिकतेमुळे मातृज व पितृज बीजभाव उत्कृष्ट असतील तर, त्यापासून उत्पन्न झालेले धातु, धातुप्रत्यनिक - द्रव्यांना (Antigen) विरोध करतात व व्याधी होत नाही.

→ जाती, कुल व व्यक्ति वैशिष्ट्यांवर हे व्याधिक्षमत्व अवलंबून असते.

(i). जाति स्वाभाविक -

1. मानव, पशु, पक्षी इ. सजीवांच्या अनेक जाती आहेत. काही द्रव्ये मानवजातिला प्रत्यनिक (pathogenic) ठरतात, तर अन्य जातींना प्रत्यनिक नसतात.
2. याउलट काही द्रव्ये मानवांना सात्म्य व इतर जातींना प्रत्यनिक असतात.
3. बहुधा ही धातुप्रत्यनिक द्रव्ये कृमिविष या स्वरुपाची असतात.
4. आंत्रज्वर (टायफॉईड), विसूचिका (कॉलरा) यांच्या जंतूच्या बाबतीत मानवेतर जाती व्याधिक्षम असतात.
5. घुबडे कॉलऱ्याला व्याधिक्षम असतात. उंदीर घटसर्पाला व्याधिक्षम असतात. कुत्र्यांना व घोड्यांना राजयक्ष्मा होत नाही.

(ii). कुल स्वाभाविक -

1). एकाच जातीमध्ये अनेक कुले समाविष्ट असतात. कुलस्वाभावानुसार व्याधिक्षमत्व / अव्याधिक्षमत्व बदलते.
2). भारतातील नेपाळी लोक राजयक्ष्माच्या जंतूना अनुकूल असतात तर ज्यू लोकांना त्याचे उत्तम व्याधिक्षमत्व असते.
3). अर्थात व्याधिक्षम व्यक्तींचाही अती बलवान कारणांशी संपर्क आल्यास व्याधी होण्याची शक्यता असते.
4). अबलवान ठरलेल्या व्याधिक्षमत्वाचा कृमिविषांमुळे पराभव होतो.

(iii). व्यक्तिस्वाभाविक -

1). धातुंचे बल उत्तम असणाऱ्या व्यक्तींमध्ये व्याधिक्षमत्व तुलनेने अधिक असते.
2). निरनिराळ्या देहधातूंमध्ये धातुप्रत्यनिक द्रव्यांना (Antigen) विरोध करण्याचे वैशिष्ट्य आढळते.
3). शरीराची बाह्यत्वचा बहुसंख्य कृमींना प्रवेश करण्याला प्रतिबंध करते.
4). आमाशयास्थ पाचकपित्त स्वतःच्या उष्ण, तीक्ष्ण गुणांचे पाचन करते व त्यामुळे कृमी मरुन जातात.
5). नेत्रामधील अश्रुद्रव कृमिविरोधी असतात.
6). vit. C मुळे व्याधिक्षमत्व व आयुर्मान अनेक पटीने वाढते. आवळ्यामध्ये याचे प्रमाण भरपूर.
7) vit. A पण कृमिविरोधी प्रतिकारक्षमत्व वाढविणारे आहे.

Scanned with CamScanner

B) अभ्यासज व्याधिक्षमत्व (Acquired)

हे व्याधिक्षमत्व निसर्गतः मिळालेले नसते.

धातुप्रत्यनिक द्रव्यांशी विरोध करण्याच्या अभ्यासातून देहधातूंमध्ये ते उत्पन्न होते.

1. सक्रिय व्याधिक्षमत्व -

विशिष्ट देहधातूंमध्ये धातुप्रत्यनिक द्रव्यांना विरोध करणारी द्रव्ये (Antibodies) तयार केली जातात.

ही प्रक्रिया क्रियाशील असल्यामुळे त्याला सक्रीय म्हटले जाते.

(i). सहज सक्रिय - व्या →
कृमी/ प्रत्यनिक द्रव्यांचा सौम्य स्वरूपात शरीरात प्रवेश होऊन सौम्य व्याधी होतो.
अथवा अल्पमात्रेत कृमी/ कृमीविषांचा शरीरात प्रवेश होऊन त्यांना विरोधी द्रव्यांची शरीरात उत्पत्ती होते.
त्यामुळे नंतर प्रवेश करणाऱ्या धातुप्रत्यनिक द्रव्यांशी ही विरोधी द्रव्ये प्रतिकार करून व्याधी होऊ देत नाहीत.
मसूरिका (smallpox), राजयक्ष्मा (TB) व्याधींच्या जंतूंचा अल्पमात्रेत प्रवेश इ. अशा प्रकारचे व्याधिक्षमत्व उत्पन्न होते.

(ii). कृत्रिम सक्रिय व्या. -
यामध्ये जंतूंची/ कृमींची बाधा आपोआप होण्याऐवजी कृत्रिम प्रक्रियेने सूचिका भरणाने अल्पमात्रेत सौम्य जंतू, व्यधरस किंवा त्यांची विषे दिली जातात, व त्यामुळे शरीरात त्यांच्या विरोधी द्रव्यांची निर्मिती होते.

ही प्रक्रिया पुढील प्रकारांनी केली जाते.

(i). जिवंत कृमी प्रविष्ट करणे -
(ii). मृत कृमी प्रविष्ट करणे
(iii). जंतूचे देहधातू (toxoids) प्रविष्ट करणे.

2. निष्क्रिय व्याधिक्षमत्व -

यामध्ये विरोधी द्रव्ये (Antibodies) बनविण्याचे कार्य देहधातूंना करावे लागत नाही.

देहधातू निष्क्रिय असले तरी तयार विरोधी द्रव्ये शरीरात प्रविष्ट केली जातात व ती धातुप्रत्यनिक द्रव्यांना (Antigen) विरोध करतात.

(i). नैसर्गिक/ सहज निष्क्रिय व्या -
गर्भामध्ये गर्भनाभिनाडीमार्फत मातेच्या देहधातूंतील विरोधी द्रव्ये गर्भामध्ये प्रविष्ट होतात किंवा जन्मानंतर 'स्तन्यामधून' अशी द्रव्ये प्रविष्ट होतात.

(ii). कृत्रिम निष्क्रिय व्या. -
विरोधी द्रव्यांची प्राण्यांच्या शरीरात निर्मिती करून त्या प्राण्यांचा रसधातू (सीरम) माणसाच्या शरीरात प्रविष्ट केला जातो.

सक्रिय	निष्क्रिय
1. कृमी शरीरे/ कृमिविषे प्रविष्ट करतात.	1. विरोधी द्रव्यांनी युक्त देहधातू प्रविष्ट करतात.
2. देहधातू क्रियाशील बनून ते विरोधी द्रव्ये निर्माण करतात.	2. देहधातू विरोधी द्रव्ये निर्माण करीत नाहीत.
3. व्याध्युत्पाद प्रतिबंधक म्हणून उपयोग	3. व्याधी उत्पत्तीनंतर व्याधिबल-विरोधी म्हणून उपयोग.
4. काही वेळा विरोधी द्रव्ये (Antibodies) निर्माण होतांना ज्वर इ. तात्कालिक व्याधिलक्षणे निर्माण होतात.	4. अशी लक्षणे निर्माण होत नाहीत.

Scanned with CamScanner

Date ____
Page ____

5. विरोधी द्रव्ये देहद्रावांमध्ये निर्माण होईपर्यंत नकारात्मक कालावधी जाते (-ve phase)	5. तयार विरोधी द्रव्ये प्रविष्ट केल्यामुळे तात्काळ व्याधिक्षमता उत्पन्न होते.

Immunity / Disease resistance

- **Def^n -**

  Immunity is the ability of the body to defend itself from 'foreign bodies' / Resistance to onset of disease after infectn by harmful germs.

- **Types -**

  - Innate / natural / Inborn nonspecific I.
  - Acquired / Adaptive Immunity
    - Components :
      - Antibody mediated Immune system (Humoral I.)
      - Cell-mediated Immune sys. (T-cell I.)
        - Helper T-cells (T_H)
        - Cytotoxic / Killer cells (T_C)
        - Memory T-cells (Primed cells)
        - Suppressor / Regulatory T-cells (T_R)
        - Natural Killer (NK) cells

Date ____
Page ____

Acquired / Specific / Adaptive I.

- Active Immunity
  - Naturally acquired active immunity
  - Artificially acquired
- Passive Immunity
  - Naturally acquired
  - Artificially acquired

Innate Immunity

→ Non-specific defense mechanism.
→ Body's 1st line of defense / 2nd line of d.
→ At birth
→ No memory

→ 1st line of defense - Intact skin, tears, urine, saliva, mucous mem. & their secretions

→ 2nd line of defense - Phagocyte i.e. neutrophills, eosinophills, dendritic cells, macrophages
In-flammation
Fever
Antimicrobial substances.
Lymphatic system

Acquired Immunity

Specific defense mechanism
3rd line of defense
Have memory

It is weak / absent

व्याधिअवस्था

व्याधी निरुक्ती- दोषवृद्धीमुळे शरीरात घडून येणाऱ्या चय, प्रकोप, प्रसर स्थानसंश्रय, व्यक्ती व भेद या अवस्था परिपूर्ण झाल्या म्हणजे व्याधी उत्पन्न होतो.

व्याधी व्याख्या -

दोषदुष्यसंमूर्च्छनाजनितो व्याधिः । मा.नि. १/७

दोष व दूष्य यांच्या संमूर्च्छनेतून, एकत्रीभवनातून, परस्पर संपर्कातून जो विशेष प्रकारचा लक्षण-समुच्चय उत्पन्न होतो. त्याला व्याधी म्हणावे.

रोगस्तु दोषवैषम्यं दोषसाम्यमरोगता ॥ वा.सू. १/२०

व्याधी अवस्था -

① धातुगतावस्था, उत्तानगंभीर अवस्था

धातुगतावस्था

मुळ व्याधीची दोष-दुष्यसंमुर्च्छना (उदा- ज्वरामध्ये पाचकपित्त व रसधातु) जेव्हा उत्तरोत्तर धातू व्यापते तेव्हा धातुगतावस्था निर्माण होते.

ज्वर, कुष्ठ, वातरक्त, मसूरिका या व्याधींमध्ये त्या त्या व्याधीची संप्राप्ती जेव्हा शरीरातील सर्व दुष्यांना व्यापू लागते तेव्हा रसगत, रक्तगत, मांसगत याप्रमाणे शुक्रधातू दुष्ट होईपर्यंत होणाऱ्या धातुगतावस्था वर्णन केल्या आहेत.

या व्याधींखेरीज अन्य व्याधीतही धातुगतावस्था उत्पन्न झालेल्या प्रत्यक्ष दिसतात.

काही वेळा अशा धातुगतावस्था एकाच व्याधीच्या धातुगतावस्था असे न म्हणता, स्वतंत्र व्याधी म्हणून त्यांची गणना.

उदा- अम्लपित्त व्याधीच्या मांसगत अवस्थेत जठरव्रण निर्माण होतो. व यालाच परिणामशूल व्याधी म्हणतात.

नवजीर्णावस्था- ज्वरामधील जीर्णावस्था धातूंच्या दौर्बल्याने उत्पन्न.

दौर्बल्यात् देहधातूनां ज्वरो जीर्णोऽनुवर्तते । च.चि. ३/२९१

नुकत्याच उत्पन्न झालेल्या ज्वरात जीर्णज्वराच्या मानाने चांगल्या प्रकारचे धातुबल असते. जीर्णज्वर ही अवस्था उत्पन्न होण्याला अग्नी, दोष, काल व व्याधीक्षमत्व हे घटकही कारणीभूत असतात.

वातप्रकोपाने सद्रव पित्ताचे निर्द्रव (अल्पद्रव, रुक्ष) पित्तात रूपांतर होते. अगर हम इसीमेही करेंगे Investment

धातुक्षयाने व्याधिक्षमत्व कमी होते. तो career का होगा

म्हणूनच, ३ आठवडे या कालावधीनंतर ज्वराला जीर्णावस्था प्राप्त होते

उत्तानगंभीर अवस्था -

वातरक्त व कुष्ठ या २ व्याधींचे वर्णन यात आढळते.

सुश्रुताने गंभीर अवस्थेला अवगाढ अवस्था म्हटले.

त्वचा व मांस यांना व्यापणारे वातरक्त उत्तान व त्याअतिरिक्त (अंतराश्रय) खोल धातूंना व्यापून असणारे ते गंभीर अवस्थेत दुष्य अधिकाधिक विकृत होते. त्यामुळे व्याधिक्षमत्व कमी होत जाते.

② स्रोतोरोध किंवा ख-वैगुण्य यांमधील रूपांतरामुळे उत्पन्न होणाऱ्या अवस्था -

i). उदरामध्ये 'रुद्ध्वा स्वेदांबुवाहीनि' अशी प्रमुख संप्राप्ती घडते व अन्नाच्या सारभागाचे विमार्गगमन झाल्याने अजातोदकावस्था, पिच्छावस्था व जातोदकावस्था अशा ३ अवस्था उत्पन्न होतात.

ii). अंतर्वेगी बहिर्वेगी अवस्था - ज्वरामध्ये वर्णन केलेल्या आहेत.

Scanned with CamScanner

Date ____
Page ____

③ अंतर्वेगी- बहिर्वेग अवस्था

i) अंतर्वेगी अवस्था -

ज्वराच्या अंतर्वेगी अवस्थेत मुख्यतः पित्त, वातप्रकोपाची लक्षणे दिसतात.

बाह्यतः तापमान तीव्रतेने वाढलेले नसतांना, अंतर्भागात तीव्र दाह होणे, पुष्कळ तहान लागणे, असंबद्ध बडबड, भ्रम होणे, अस्थिसंधीमध्ये तीव्र वेदना, दोष, पुरिष, स्वेद. इ. अवरोध होणे ही लक्षणे दिसतात.

कृमी अथवा अत्यंत प्रकुपित दोष-दुष्यसमुर्च्छना यामुळे होणाऱ्या उग्र बाधकर आमामुळे (toximia) अशी अवस्था उत्पन्न होते.

ii) बहिर्वेगी अवस्था -

दाह होणे, तृष्णा लागणे, प्रलाप, सकष्ट श्वसन (जलद), भ्रम, संधी व अस्थिशूल, स्वेद न येणे, दोष व मल-मूत्र यांचा संग अशी लक्षणे दिसतात.

बहिर्वेगी अवस्थेत, दाह फक्त त्वचेमध्ये असतो, पण तृष्णा इ. कमी गंभीर असतात.

④ आम व अग्निमांद्यामुळे रूपांतर झाल्याने उत्पन्न होणाऱ्या अवस्था -

अग्निमांद्य व आम हे दोनही परस्परावलंबी असल्याने त्यांचा एकत्र विचार करणे जरूर आहे.

आमावस्था, पच्यमानावस्था व पक्वावस्था अशा ३ अवस्था यामुळे उत्पन्न होतात.

Date ____
Page ____

जाठराग्नी व धात्वाग्नी दौर्बल्यामुळे, अपक्व आहाररसाचे पचन न झाल्याने, दोषांच्या परस्पर समूर्च्छनेमुळे / मलसंचयाने आमाची उत्पत्ती होते.
यान आमामुळे सामदोष, सामदूष्य, साममल यांची निर्मिती होते.

आमाच्या जेव्हा पाक सुरु होतो, तेव्हा पच्यमानावस्था सुरु होते, व जेव्हा संपूर्ण आमाचे पचन होते तेव्हा निरामावस्था उत्पन्न होते. या अवस्था ज्वर, अतिसार, ग्रहणी इ. व्याधीत वर्णन केलेल्या आहेत.

वरील वर्गीकरणामध्ये दोष-दूष्य, स्रोतोरोध इ. कारणांनी होणाऱ्या अवस्था वर्णन केल्या आहेत.

⑤ आशुकारी व चिरकारी अवस्था -

काही व्याधी स्वभावतः केवळ आशुकारी असतात.
उदा- मसूरिका, विसूचिका, पित्त-रक्तज प्रवाहिका (Bacillary dysentery)

बहुतेक वातव्याधी स्वभावतःच चिरकारी असतात.
परंतु काही व्याधी आशुकारी अवस्थेतून चिरकारी अवस्थेत जातात.

हेतुसातत्य, दोषांचे बल, धातुदुष्टी, व्याधिक्षमत्व इ. गोष्टी याला कारणीभूत होतात.
उदा- वृक्कशोथ (Nephritis), कफवातज प्रवाहिका (Amoebic dysentery) प्रतिश्याय (Rhinitis), नेत्राभिष्यंद (Conjunctivitis).

गुल्माचे (Benign tumor) अर्बुद (Malignant tumor) या अवस्थेत रूपांतर होणे किंवा मूलतः एका आशयाला, स्रोतसाला व्यापून असणाऱ्या अर्बुदाचा शरीरात / इतर अवयवांमध्ये / स्रोतसांत प्रसर व स्थानसंश्रय होणे (metastasis) ही व्याधीअवस्थेची उदाहरणे आहेत.

Scanned with CamScanner

अवस्था ज्ञानाचे प्रयोजन -

ज्वरामध्ये स्वेदावरोध व संताप अशी लक्षणे वगळून उरलेल्या लक्षणांपैकी काही दोषांमुळे तर काही अवस्थेमुळे उत्पन्न होतात.

या दोन्हीतील नेमकेपणा लक्षात नाही आला तर, व्याधींचे निदान करण्यात अनिश्चितता उत्पन्न होईल.

उदा - ज्वरामध्ये आमावस्था, पच्यमानावस्था, निरामावस्था अशा ३ अवस्था व त्यांची लक्षणे आढळतात.
त्याचप्रमाणे वातज्वर, पित्तज्वर, कफज्वर व सान्निपातिक ज्वरांची लक्षणेही दिलेली आढळतात.

आमावस्था व कफज्वर व पच्यमानावस्था व पित्तज ज्वर यांच्या लक्षणांत फारच साम्य आहे. अशा स्थितीत, जर रोगावस्थेचे ज्ञान नसेल तर प्रत्येक ज्वरित रुग्णाचे प्रथमतः कफज्वर व नंतर पित्तजज्वर असे निदान बदलत जाईल.

कारण आम व पच्यमानावस्था सर्वसामान्यपणे प्रत्येक ज्वरात निश्चित आढळून येतात.

ज्वराची सामावस्था व कफजज्वर यांमध्ये गुरुगात्रता, प्रसेक, हृल्लास, स्तंभ, तंद्रा ही लक्षणे समान असतात.
परंतु अपक्ती, क्षुधामांद्य व बहुमूत्रता ही लक्षणे फक्त ज्वराच्या सामावस्थेतच आढळतात. त्यावरून दोघांमध्ये व्याधिव्यवच्छेद करता येतो.

अवस्थेनुरूप चिकित्साही बदलते. नवज्वरात लंघन द्यावे, जीर्णज्वरात घृतपान - धातूंना बल देणारी बृंहण चिकित्सा द्यावी.

अतिसारात प्रवधातूचे निःस्सरण होत असते. त्याचे स्तंभन करणे ही प्रमुख चिकित्सा. परंतु या ठिकाणी अवस्थेचा विचार न करता आमावस्थेतच स्तंभन दिले तर आमाचा रोध झाल्याने उपद्रव.

काश्यप - " अयोग्य वेळी (अवस्था लक्षात न घेता) दिलेले औषध पथ्य पाळून घेतले तरी गुणकारी न ठरता दोषप्रकोपच करील, उलट अवस्था लक्षात घेऊन केलेली चिकित्सा अमृताप्रमाणे गुणकारी ठरेल. "

साध्यासाध्यत्व - अंतर्वेगी ज्वर कष्टसाध्य.
बहिर्वेगी ज्वर सुखसाध्य.
तसेच धातुगतावस्थेमध्ये सामान्यपणे 'रसगत अवस्थेपर्यंत' सुखसाध्यत्व असते व त्यापुढील कष्टसाध्य असतात. शुक्रगत अवस्था असाध्य.

जो चिकित्सक अवस्थेचे योग्य ज्ञान न घेता चिकित्सेला सुरुवात करील तो सुखसाध्य रुग्णाला कष्टसाध्य, व कष्टसाध्य रुग्णाला सुखसाध्य मानून फार मोठी चूक करील.

Scanned with CamScanner

* निदान *

* **व्याख्या** → व्याधीचे हेतू, लक्षणे, व्याधीज्ञानासाठी केलेल्या विविध परिक्षा यांचा साकल्याने विचार करुन त्यांचा परस्परांशी संबंध जोडून व्याधीचा निश्चय करणे म्हणजे **निदान**

व्याधीच्या उत्पत्तीला कारणीभूत होणारे हेतू ⇒ निदान

* **पर्याय** →
① निमित्त - आरंभ करून देणारे
② हेतू - कारण
③ कारण
④ प्रत्यय - कार्याशी संबंध प्रकट करणारे.

* **हेतूंचे प्रकार** → 5 प्रकारे वर्गीकरण (14 प्रकार)

① सान्निकृष्ट	① असात्मेंद्रियार्थ	① दोषहेतू	① व्यंजक	① बाह्य
② विप्रकृष्ट	② प्रज्ञापराध	② व्याधिहेतू	② उत्पादक	② आभ्यंतर
③ व्याभिचारी	③ परिणाम	③ उभयहेतू		
④ प्राधानिक				

अ) ① **सान्निकृष्ट** → व्याधीच्या उत्पत्तीच्या संबंधात ~~अगदी~~ कालदृष्ट्या अगदी जवळचे असलेले कारण।

② **विप्रकृष्ट** → व्याधीच्या उत्पत्तीच्या संबंधात कालदृष्ट्या दूरचे असलेले कारण.

(i) स्थान वैगुण्य निर्माण करणारे हेतू

(ii) दोष प्रकोप करणारे हेतू

Scanned with CamScanner

③ व्याभिचारी → ठरल्याप्रमाणे, नियमाप्रमाणे न होणे. निदानामुळे दोष प्रकोप होऊन त्यांची दूष्यांशी संमूर्च्छना होणे व त्याने व्याधी उत्पन्न होणे हा नियम.

④ प्राधानिक → ज्याचे परिणाम निश्चितपणे अत्यंत त्वरेने दोषांचा प्रकोप करून व्याधी उत्पन्न करण्याला कारणीभूत होतात त्याला प्राधानिक निदान म्हणतात.

आ] ① असात्मेंद्रियार्थ
② प्रज्ञापराध
③ परिणाम
} त्रिविध हेतु.

इ] ① दोषहेतु → दोषांचे प्रकोप करणारे निदान
रस-दोष संबंध

मधुर, अम्ल, लवण - कफप्रकोप, ~~कफ~~ वातशामक
कटु, तिक्त, कषाय - वातप्रकोप, कफशामक
कटु, अम्ल, लवण - पित्तप्रकोप
मधुर, तिक्त, कषाय - पित्तशामक

② व्याधिहेतु → विशिष्ट व्याधी उत्पन्न करणारी विशेष कारणे.
उदा. मृदभक्षण पाण्डुरोग
तुरट माती - वातप्रकोप
क्षार माती - पित्तप्रकोप
मधुर माती - कफप्रकोप

③ उभयहेतु → विशिष्ट दोष आणि विशिष्ट व्याधी या दोघांनाही जे एकसमवायसंबंधाने कारणीभूत असते त्यास उभयहेतु

4 ① उत्पादक हेतु → दोषांशी समवाय कारणाने संबद्ध होऊन व्याधी उत्पन्न करणाऱ्या हेतूला उत्पादकहेतू दोषांची चयप्रकोपादी अवस्था उत्पन्न करणाऱ्या हेतूल

② व्यंजक हेतु → प्रकट करणारा, प्रेरणा देणारा अथवा व्यक्त करणाऱ्या हेतूला व्यंजक हेतु म्हणतात

5 ① बाह्य हेतु → आहार, विहार, काल यांमुळे जो दोषप्रकोप होऊन व्याधी निर्माण होतो त्याला.

② अभ्यंतर हेतु → प्रकुपित वात, पित्त, कफ यांना अभ्यंतर हेतु म्हटले आहे.

* निदान ज्ञानाचे महत्त्व :-

① व्याधिव्यवच्छेदनासाठी →
काही व्याधीलक्षणे अनेक व्याधींमध्ये सारखीच असतात परंतु विशिष्ट व्याधिहेतु असेल तर तो समजल्यामुळे लक्षण साधर्म्य असणाऱ्या अन्य व्याधींपेक्षा तो विशिष्ट व्याधी असला पाहिजे असे ओळखता येते.

② निदानपरिवर्जनासाठी → ज्या हेतूंमुळे व्याधी झाला असेल ते हेतू टाळणे हा चिकित्सेतील एक महत्त्वाचा भाग असतो.

Scanned with CamScanner

* पूर्वरूप *

* **व्याख्या** → प्रत्यक्ष व्याधीची विशिष्ट लक्षणे उत्पन्न होण्यापूर्वी अनेक वेळा काही प्राथमिक लक्षणे उत्पन्न होतात व त्यावरून होणाऱ्या व्याधीबाबत अंदाज घेता येतो त्याला पूर्वरूपे म्हणतात.

अस्पष्ट लक्षणे दिसतात परंतु त्यावरून दोषवैशिष्ट्य समजत नाही
केवल भविष्यकालीन व्याधीचा बोध

* **पर्याय** →

* **प्रकार** → २ प्रकार ① सामान्य पूर्वरूप
② विशेष पूर्वरूप

① **सामान्य पूर्वरूप** →

दोष व दूष्य यांची संमूर्च्छना घडत असताना नंतर उत्पन्न होणाऱ्या व्याधीची सूचक लक्षणे उत्पन्न होतात, पण उत्पन्न होणाऱ्या व्याधीतील दोष कोणत्या प्रकारचा आहे हे सांगता येत नाही या लक्षणांना सामान्य पूर्वरूप म्हणतात.
उदा. ज्वर व्याधी

② **विशेष पूर्वरूप** →

विशिष्ट पूर्वरूपे व्याधीतील दोषही थोड्या प्रमाणात सूचित करतात.
जी दोष लक्षणे पुढे रोगोत्पत्तीनंतर असतात तीच अल्प, अस्पष्ट, सौम्य प्रकारात आली असली म्हणजेच त्यांना विशेष पूर्वरूप म्हणतात.

या लक्षणांमुळे व्याधीबरोबर दोषांचेही अनुमान करता येते
उदा. → वातव्याधी
उर: क्षत

① शारीर पूर्वरूपे → ज्वरामध्ये उत्पन्न होणारी आलस्य, गौरव, जृम्भा इ. पूर्वरूपे.
② मानस पूर्वरूपे → कोणत्याच गोष्टीची इच्छा नसणे, हितकर उपदेश करणाऱ्या वडील माणसांचा तिटकारा वाटणे इ. पूर्वरूपे
③ शारीरमानस पूर्वरूपे → आंबट, खारटाची आवड, गोड नको इ.
④ काही पूर्वरूपे पुढे उत्पन्न होणाऱ्या लक्षणांशी पूर्णपणे विपरीत, विरुद्ध अशी असतात.
⑤ काही पूर्वरूपे व्याधी होत असताना नाहीशी होताना.
⑥ काही पूर्वरूपे अधिक व्यक्त होऊन रूपात परिणत होतात.

* **पूर्वरूप - ज्ञानाचे महत्त्व** →

① व्याधीचे पूर्वरूप सांगितले नाही तर पूर्वरूपकालीन करावयाचे चिकित्साविशेष उपयोगात आणता येणारी नाहीत.
उदा. ज्वर
② व्याधीचे साध्यासाध्यत्व जाणण्यासाठी देखील पूर्वरूपाची मदत होते
③ व्याधिविनिश्चयासाठी पूर्वरूपाचा उपयोग होतो

Scanned with CamScanner

* रूप *

* **व्याख्या** → ① पुर्वरूपावस्थेमहद्ये अल्प व्यक्त असलेली लक्षणे व्याधीचे ज्ञान पूर्णपणे करून देण्याइतकी झाली म्हणजे त्यांनाच्या व्याधीचे व्यक्त रूप म्हणतात.

* **पर्याय** → संस्थान, व्यंजन, लिंग, लक्षण, चिन्ह, आकृती

उदा →

② उत्पन्न झालेल्या व्याधीचाच फक्त बोध करून देणाऱ्या लक्षणाला रूप म्हणतात
③ रूप हे विशिष्ट पद्धतीने शरीरात घडणाऱ्या दोष-दुष्यसंमूर्च्छनारूप व्यापाराचे शरीरावर उमटणारे बाह्यचिन्ह असते.

* **प्रकार** → 5 प्रकार. ① प्रतिनियत लक्षणे
② दोषज लक्षणे
③ अवस्थांनुसार लक्षणे
(Symptoms) ④ आतुरसंवेदय लक्षणे (वेदना)
(Signs) ⑤ वैदयसंवेदय चिन्हे (संस्थान)

① **प्रतिनियत लक्षणे** → प्रत्यात्मक लिंग व अव्याभिचारी लक्षणे
→ प्रत्येक व्याधीची विशिष्ट प्रतिनियत लक्षणे वर्णन केलेली आहे.
→ त्या त्या व्याधीमहद्ये ही प्रतिनियत लक्षणे असली तरच त्याला व्याधी म्हणावे.
→ यालाच व्याधीची सामान्य लक्षणे म्हणतात.
उदा. ज्वरामहद्ये संताप, अतिसारामहद्ये द्रवमलप्रवृत्ती इ.

② **दोषज लक्षणे** → विशेष लक्षणे.
→ प्रत्येक व्याधीमहद्ये दोषानुसार लक्षणे असतात.
उदा. वातज कुष्ठ – खर, तोद, बहुल
पित्तज कुष्ठ – अतिस्वेद, कृमी, दाह, राग, पाक
कफज कुष्ठ – क्लेद, गौरव काठिण्य

③ **अवस्थांनुसार लक्षणे** →
① वेगावस्था – अवेगावस्था
② दोषपाक – धातुपाक
③ उत्तान – गंभीर
④ साम – निराम इ अवस्थांनुसार लक्षणे

④ **आतुरसंवेदय लक्षणे** → वेदना (Symptoms)
ही लक्षणे फक्त रुग्णालाच समजत असल्याने प्रश्नपरीक्षेने वैदयाला याबद्दलची माहिती करून घ्यावी लागते
उदा. क्षुधा, तृष्णा, मल-मूत्र विसर्जन इ.

⑤ **वैदयसंवेदय चिन्हे (संस्थान)** (Signs)
- वैदयाने निश्चित केलेल्या रूपाला वैदयसंवेदय चिन्हे म्हणतात
- वैदयाला विविध परिक्षा करून व्याधीचे ज्ञान निश्चित करावे लागते.
उदा. → मुख, नेत्र, नाडी, जिव्हा
दर्शन, स्पर्शन, प्रश्न इ. परिक्षा

* **रूपज्ञानाचे महत्त्व** →
① लक्षणांमुळे दोष व त्यांच्या अंशांश कल्पनेबद्दल माहिती मिळते.
② लक्षणांवरून स्थानसंश्रयाचे ज्ञान मिळते.
③ व्याधीविनिश्चय व त्याचा प्रकार लक्षणावरूनच कळतो.
④ व्याधिव्यवच्छेद करण्यासाठी अथवा व्याधीचे साध्यासाध्यत्व ठरवण्यासाठी लक्षणांचेच सहाय्य घेतले जाते.
⑤ लक्षणावरून निदान ठरवता येते.
⑥ लक्षणावरून चिकित्सा केली जाते.

* **व्याधी व लक्षण यातील भेद** P.g. (373)

* उपशय - अनुपशय *

* **उपशय** → ① व्याधी झाल्यानंतर विशिष्ट आहार, विहार व औषधी यांमुळे रोगाची लक्षणे कमी होऊन रुग्णाला आराम वाटतो याला उपशय म्हणतात.

* **अनुपशय** → या उलट ज्या गोष्टींनी लक्षणे वाढतात त्यांना अनुपशय म्हणतात

* **व्याख्या** → ② हेतूशी अथवा व्याधीशी विरुद्ध गुणधर्माची असल्यामुळे औषध, अन्न वा विहार यांचा जो सुखावह उपयोग होतो त्याला उपशय म्हणतात.

③ व्याधीने उत्पन्न होणाऱ्या दुःखाचे शमन ज्याने शमन होते त्याला उपशय

* **प्रकार** : २ प्रकार

विपरीत
① हेतूविपरीत
② व्याधीविपरीत
③ हेतूव्याधीविपरित

यांच्याशी विरुद्ध गुणधर्माची औषधे, अन्न, विहार यांनी जो सुखावह उपयोग होतो

विपरीतार्थकारी
① हेतू
② व्याधी
③ हेतूव्याधी

यांच्याशी समान गुणात्मक औषधे, अन्न, विहार दिसली तरी परिणाम मात्र विरुद्ध गुणांची द्रव्ये वापरली असताना जसा होतो तसा सुखावह झाल्यास या प्रकारला

① **हेतुविपरित उपशय** :
औषध → कफामुळे उत्पन्न होणाऱ्या शीतज्वरावर सुंठीसारखे उष्ण औषध
अन्न → श्रमामुळे उत्पन्न होणाऱ्या वातज्वरावर रसौदन
विहार → दिवसा झोपल्याने वाढलेल्या कफावर रात्री जागरण करणे

② **व्याधीविपरित उपशय** :-
औषध → प्रमेहावर हरिद्रा
अन्न → अतिसारासाठी विबंध उत्पन्न करणाऱ्या मसुराच्या डाळीचे यूष
विहार → उदावर्तविर प्रवाहण

③ **हेतूव्याधीविपरित उपशय** :-
औषध → वातज शोथावर वातहर व शोथघ्न असे दशमूल
अन्न → वातज ग्रहणीवर ताक
विहार → दिवसा झोपल्याने स्निग्ध गुण वाढतो. रात्री जागरण.

④ **हेतुविपरितार्थकारी उपशय** :-
औषध → पित्तव्रणशोथावर पित्तकर असा उष्ण उपनाह
अन्न → व्रणशोथाच्या पच्यमानावस्थेत विदाह उत्पन्न करणारे अन्न
विहार → वातोन्मादामध्ये त्रासन, मकदम धक्का बसेल असे करावे.

⑤ **व्याधिविपरितार्थकारी उपशय** →
औषध → छर्दीमध्ये ओकारी करणारे गेळफळ
अन्न → अतिसाराच्या आमावस्थेत दूध
विहार → छर्दी होत असता मुद्दाम घशात बोटे घालून ओकारी

⑥ **हेतूव्याधीविपरितार्थकारी** →
औषध → अग्नीने भाजलेल्या जागेवर उष्ण असा अगरुच्या लेप
विषावर विष
आहार → मद्यपानामुळे उत्पन्न झालेल्या मदावर मदकारक मद्य
विहार → व्यायामामुळे उत्पन्न झालेल्या मूढवातावर पाण्यात पोहण्याचा व्यायाम

* उपशय व चिकित्सा → P.g. 38

SANKET GAYKHE

Page No.: Date:

* संप्राप्ती *

* **व्याख्या** → दोष ज्या विशिष्ट प्रकारच्या कारणांनी / हेतूंनी दूषित होऊन व ज्या प्रकारे शरीरामध्ये रोगाची भ्रमण करतात. त्यानुसार शरीरामध्ये रोगाची उत्पत्ती करतात ह्या व्याधीउत्पत्ती प्रक्रियेला संप्राप्ती म्हटले आहे.

→ हेतुसेवनापासून दोष दुष्टी व दोषविसर्पणासह व्याधी उत्पत्तीपर्यंतच्या प्रक्रियेला संप्राप्ती म्हणतात.

* **घटनाक्रम** → हेतुसेवन → वेगवेगळ्या प्रकारे दोषांची दुष्टी → शरीरामध्ये वेगवेगळ्या प्रकारे दोषांचे विसर्पन व भ्रमण → स्रोतोवैगुण्याच्या ठिकाणी स्थानसंश्रय → व्याधी उत्पत्ती

* **पर्याय** → ① जाति -
② आगति -

* **संप्राप्ती घटक** :-
① हेतुसेवन
② दोषदुष्टी
③ दोषांचा प्रसर
④ स्थानवैगुण्य
⑤ दोष-दूष्य संमूर्च्छना किंवा स्थानसंश्रय
⑥ व्याधी घटक - व्याधी व्यक्तता
⑦ भेद - व्याधीमधील विशिष्ट दोष प्रकारांच्या लक्षणांची उत्पत्ती

Page No.: Date:

* **संप्राप्तीचे भेद** : 5 प्रकार
① संख्यासंप्राप्ती
② विकल्प
③ प्राधान्य
④ बल
⑤ काल

① **संख्यासंप्राप्ती** → म्हणजे व्याधीचे प्रकार होय.
उदा. ज्वराचे 8, गुल्माचे 5, कुष्ठाचे 7 प्रका
→ संख्या संप्राप्तीमुळे रोगाच्या प्रकाराचे ज्ञान होते.
→ व्याधीचे सामान्य स्वरूपात वर्गीकरण.

विधी संप्राप्ती → संख्या संप्राप्तीचा पोटभेद.
→ एकच प्रधान कल्पना आहित धरून जे प्रकार पाडले जातात त्याला
उदा. साध्यासाध्य कल्पना → साध्य, असाध्य, कष्टसाध्य, याप्य इ.

② **विकल्प संप्राप्ती** → दोष प्रकुप आल्यानंतर त्याच्या विकृतीच्या स्वरूपात जी तर-तमता असते त्याला विकल्प म्हणतात.

③ **प्राधान्य संप्राप्ती** → स्वातंत्र्य व पारतंत्र्याच्या आधारावर दोषांचे प्रधान- अप्रधानत्वाचे वर्णन ज्याद्वारे केले जाते त्यास
→ प्राधान्य संप्राप्तीमुळे व्याधीमधील दोषांच्या तरतमभावाचे ज्ञान होते
→ चिकित्सा प्रामुख्याने प्रधान संप्राप्तीचीच केली जाते

Scanned with CamScanner

④ **बल संप्राप्ती** → हेतू, पूर्वरूप, रूप, स्थानसंश्रय, दोषदूष्य संमूर्च्छना इ. घटकांच्या कमी आधिक प्रमाणावरून व्याधीच्या बलाचे अथवा अबलाचे ज्याने विशेष ज्ञान होते तसेच व्याधीच्या अवयवांच्या एकदेशीय अनेक देशीयत्वावरूनही विशेषत्वाने व्याधी बलाचे ज्यामुळे ज्ञान होते त्यास बल संप्राप्ती म्हणतात.
→ बल संप्राप्तीमुळे व्याधीच्या बलाबलीयत्वे ज्ञान होते

⑤ **काल संप्राप्ती** → व्याधीमध्ये रात्र-दिवस भोजनकाल तसेच ऋतू यांनुसार दोषांमध्ये जे बदल होत असतात त्याची माहिती अथवा ज्ञान ज्या संप्राप्तीमुळे होते त्यास काल संप्राप्ती म्हणतात.
उदा. →

⑥ **सामान्य व विशेष संप्राप्ती :**

दोष विशेष रहीत सर्व प्रकारांसाठी एकच सामायिक अशी जी संप्राप्ती असते ती सामान्य संप्राप्ती

दोषज प्रकारांनुरूप जी व्याधीची वेगवेगळी संप्राप्ती सांगितलेली आढळते त्यास विशेष संप्राप्ती

⑦ **स्थानिक व सार्वदेहिक संप्राप्ती**

⑧ **निज- आगंतु संप्राप्ती**

* **संप्राप्ती ज्ञान**

SANKET GAIKHE

दोष वैषम्याचा विचार आहे
↑ दोष वैषम्य < 1) वृद्धी, 2) क्षय

* **षट्क्रियाकाल** *

[दोष दूष्य संमूर्च्छना जानितो व्याधिः।]

✓ प्रत्यक्ष व्याधि निर्माण होण्यापूर्वी शरीरात घडणाऱ्या विभिन्न घटना म्हणजे षट्क्रियाकाल होय

✓ कालार्थकर्मणां योगो हीनामिथ्यातिमात्रकः।
सम्यग्योगश्च विज्ञेयो रोगारोग्यैककारणम्॥

दोषप्रकोपक कारणांचे सेवन केल्यापासून व्याधिनिर्मिती होईपर्यंत ज्या घटना घडतात त्यांना संप्राप्ती म्हणतात.

षट्क्रियाकाल :- व्याधींचा जन्म होण्यासाठी दोषांना अनेक अवस्थांमधून जावे लागते. त्यापैकी महत्त्वाच्या 6 अवस्थांना

संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयं।
व्यक्तिं भेदं च यो वेत्ति दोषाणां स भवेत भिषक्॥

1) संचय → यामध्ये केलेली चिकित्सा सोपी आणि आधिक लाभदायक असते.
2) प्रकोप
3) प्रसर
4) स्थानसंश्रय
5) व्यक्ति
6) भेद

✓ 1) **संचय अवस्था** :- दोषांच्या गुणाच्या विपरित चिकित्सा

चय अवस्थेत बिघडलेले दोष स्वतः च्या स्थानामध्ये साठण्यास सुरुवात होते.

लक्षणे
1) वातदोष → ① स्तब्धपूर्णकोष्ठता निर्माण झाल्याची
→ ② उदर पूर्ण भरल्याची भावना निर्माण होते.
2) पित्तदोष → ① नख, नेत्र, मूत्र यांठिकाणी पिवळेपणा

दोषव्यापार

- साम्य
  - प्राकृत व्यापारातील चय - प्रकोप - प्रशम यासह.
- वैषम्य
  - क्षय
  - वृद्धी
    - स्वस्थानात वृद्धी
      - सुश्रुत
        - चय
        - प्रकोप
      - चरक व वाग्भट
        - चय
    - अन्य स्थानात जाणे - प्रसर
      - सुश्रुत
        - प्रसर
        - स्थानसंश्रय
        - व्यक्ती
        - भेद
      - चरक व वाग्भट
        - प्रकोप

* षट्क्रियाकाल व त्याचे महत्त्व → P.g. 411

३) कफदोष :- ① शारिरीक उष्णता कमी होते.
② अग्नि मंद होती.

{ दोषांना चय अवस्थेतच जिंका }

चय एव जयेत दोषम् ।

२) **प्रकोपावस्था :- शोधन शमन चिकित्सा**

दोष स्वतःच्या स्थानात अधिक प्रमाणात साठल्यास प्रकुपित होतात.

१) वातदोष → चल गुणाधिक्याने कोष्ठ उदर प्रदेशी. वेदना निर्माण होतात, पोटात गुडगुड होणे आवाज निर्माण

२) पितप्रकोप → आम्लिका (तोंडाला आंबट पाणी येणे)
पिपासा (अत्याधिक तृष्णा)
परिदाह (सर्वांगदाह)

३) कफदोष → अन्नाबद्दल तिटकारा निर्माण होणे
हृदयोत्क्लेद (छातीस जडस बसल्याची भावना)
(हृदय प्रदेशी काहीतरी संचित झाल्यासारखे)

३) **प्रसरावस्था :-** दोष प्रकोपावस्थेत स्वस्थानामध्ये अधिक प्रमाणात आढळतात.
→ दोषवृद्धी चालूच राहिली तर प्रसरावस्थेत दोष स्वस्थान सोडून बाहेर पडतात व प्रसर पावतात. म्हणजे संपूर्ण शरीरात भ्रमण करतात.

१) वातदोष → वातदोष विमार्ग गमन करतो म्हणजे स्वतःच्या प्राकृत मार्गातून गति बदलून वेगळ्याच मार्गाने गती निर्माण होतात
(आटोप (गुडगुड स्वरूपाचा ध्वनि निर्माण)

२) पित्तदोष → कमी अधिक स्वरूपाचा दाह निर्माण होतो

३) कफदोष → ① पदार्थांना रुची न जाणवणे (अरोचक)
② अन्न न पचणे
③ (अंगसाद) अन्न गळून गेल्यासारखे वाटणे
④ उलटी (छर्दी)

* स्नेहन स्वेदन पूर्वकर्म
* शोधन * शमन * रक्तमोक्षण

स्वस्थान सोडल्यानंतर दोष ज्या ज्या ठिकाणी पोहोचतील त्या ठिकाणी विकृतीचा वर्षाव करतात

4) स्थान-संश्रय : (रसायन चिकित्सा)

→ प्रसरावस्थेत बिघडलेले दोष सर्व शरीरभर फिरत असताना ज्या ठिकाणी स्थानवैगुण्य, स्रोतोवैगुण्य (त्या त्या स्थानाचा दुबळेपणा) असेल त्या ठिकाणाचा आश्रय घेतात. या अवस्थेत जी लक्षणे निर्माण होतात. त्यांना त्या आजाराची पूर्वरूपे म्हणतात म्हणजेच व्याधिसूचक लक्षणे म्हणतात.

5) व्यक्तीअवस्था : (व्याधिदर्शन)

व्याधिप्रत्यानिक चिकित्सा (व्याधि विरोधी)

व्यक्ती म्हणजे व्यक्त होणे.
या अवस्थेत ज्वर, अतिसार इ. व्याधींची लक्षणे व्यक्त होतात.
प्रत्यात्मक लक्षणांची काही उदा.
1) प्रवाहिका 2) ग्रहणी
2) कामला.

↗ ही शेवटची अवस्था

6) भेद अवस्था :- व्याधीचे परिपूर्ण ज्ञान.

→ पोटभेद अवस्थाभेद

या अवस्थेत व्याधीचा दोषज प्रकारही स्पष्ट होतो.
उदा. द्रवमल प्रवृत्ती व इतर लक्षणावरून अतिसार हा व्याधी झाल्याचे स्पष्ट होते.

1) वातज अतिसार → द्रवमल प्रवृत्ती थांबून थांबून व तीव्र उदरशूल सह.
2) पित्तज अतिसार → पित्तरक्तवर्णी असल्यास
3) कफज अतिसार → स्त्यान मलप्रवृत्ती असेल

दोषज प्रकार स्पष्ट झाल्यामुळे व्याधिच्या सामान्य चिकित्से बरोबरच दोष विशिष्टतेनुसार अंशांश चिकित्सा करता येते.

Scanned with CamScanner

उपद्रव

उपद्रव हा व्याधी उत्पन्न झाल्यानंतरच्या काळात निर्माण होणारा, पण प्रथमोत्पन्न व्याधीच्या आश्रयाने असणारा दुसरा एक व्याधीच होय. व्याधीच्या मागून उत्पन्न होतो, म्हणून त्याला उपद्रव म्हणतात.

• व्याख्या -

① "रोगारंभक दोषप्रकोपजन्यो अन्यविकार: उपद्रव: ।" मा.नि.

ज्या दोषांच्या प्रकोपाने प्रथम व्याधी उत्पन्न झाला, त्याच दोषाच्या आधिक प्रकोप (अपथ्यामुळे- मिथ्या आहार- विहारामुळे) चालू राहिला तर अधिक प्रकोपीत झालेला गोप दोष अन्य व्याधी उत्पन्न करतो, त्यालाच उपद्रव म्हणतात.

उदा- पित्तप्रकोपाने उपद्रवरूप रक्तपित्त उत्पन्न होते.

② हेतुसातत्यामुळे प्रकुपित झालेला मुळचाच दोष एका वेगळ्याच संप्राप्तीला प्रारंभ करतो आणि त्याचाच परिणाम म्हणून रोगरूप उपद्रव निर्माण होतो.

③ व्याधी प्रधान व उपद्रव हा त्यावर अवलंबून असणार अनुबंध्य, गौण असतो. दोन्हींना निदानभूत असणारा दोष प्राय: एकच, ∴ प्रथम उत्पन्न झालेल्या व्याधीची चिकित्सा केली म्हणजेच मूळचा व्याधी नाहीसा झाला, की उपद्रवाचाही नाश होतो.

• प्रकार -

① स्थुल -
स्थुल म्हणजेच बलवान.

जो उपद्रव उत्पन्न झाला आहे, तो जर संपूर्ण लक्षणांनी युक्त असा उत्पन्न झाला तर त्याला बलवान उपद्रव म्हणतात.

उदा- प्रतिश्याय व्याधीत राजयक्ष्मा, हृद्रोग इ. उपद्रव i.e. बलवान.

Scanned with CamScanner

② अणु / अवळवान
→ अणू म्हणजेच अवळवान.

→ अल्प लक्षणांनी युक्त उपद्रवाला अवळवान / अणू उपद्रव म्हणतात.
उदा - प्रतिश्यायामध्ये कास उपद्रव उत्पन्न होणे.

उपद्रव व व्याधिसंकर

• व्याधिसंकर -

→ व्याधिसंकर अर्थात २ व्याधी शरीरात एकाच वेळी उपस्थित असणे होय, परंतु त्यांचा परस्परांशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसतो.

→ निरनिराळ्या हेतूंनी, निरनिराळ्या दोषांनी व वेगवेगळी संप्राप्ती घडून, ज्या वेळेस शरीरात २ किंवा अधिक व्याधी उत्पन्न होतात, त्या वेळेस व्याधिसंकर होतो.

→ उदा - ज्वरित रुग्णाला आघाताने अस्थिभंग होणे
कुष्ठरोगी माणसाला कुष्ठ होणे
प्रमेह झालेल्या रुग्णास परिणामशूल होणे.

• व्याधिलिंग संकर -

① एकार्थकारी - काही वेळा एखादा व्याधी दुसऱ्या व्याधीचे कारण होऊन स्वतः प्रशम पावतो.

② उभयार्थकारी -
एखादा व्याधी दुसऱ्या व्याधीचे कारण होऊनही स्वतः तसाच कायम राहतो.
उदा - आमवात नंतर हृद्रोग उत्पन्न - दोनही शरीरात राहतात.

③ निदानार्थकारी -
पूर्वीचा व्याधी ज्यापासून उत्पन्न होणाऱ्या दुसऱ्या व्याधीचे निदान ठरतो.

उदा - निदानार्थकारी व्याधी त्रिविध हेतूंनी / व्याधीहेतूंनीच (प्रज्ञापराध, असात्म्येंद्रियसंयोग, परिणाम) उत्पन्न होतो.

• व्याधीसंकर उदाहरणे -

ज्वराच्या संतापामुळे रक्तपित्त उत्पन्न होते / रक्तपित्तामुळे ज्वर →
रक्तपित्त व ज्वर यांमुळे शोष (धातुक्षय) उत्पन्न होतो.

प्लीहावृद्धीमुळे उदररोग → उदरामुळे शोथ

दिवसा झोपणे यासारखे अपथ्य → ∴ पडसे → ∴ कास → ∴ क्षय →
∴ धातुक्षय / ओजक्षय → ∴ राजयक्ष्मा

• उपद्रव व व्याधिसंकर संबंध -

→ व्याधिसंकर म्हणजे २ व्याधी शरीरात एकाच वेळी उपस्थित असणे उपद्रव निर्माण होतो तेव्हा देखील मुळ व्याधी व उपद्रव असे व्याधी असतात व व्याधीच्या आश्रयाने असतो.

→ पण व्याधिसंकरामध्ये केवळ २ व्याधी शरीरात उपस्थित असणे असे नसून, त्यांचा परस्परांशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसतो.

Scanned with CamScanner

उदर्क

• व्याख्या -
प्रथम व्याधी नाहीसा झाल्यावर त्याचा परिणाम म्हणून शरीरावर जी विकृती निर्माण होते, त्याला उदर्क म्हणतात.

उदा - ज्वर व्याधी नाहीसा झाल्यावर शिल्लक राहणारा कास / दौर्बल्य

→ प्रथम व्याधी नाहीसा झाल्यानंतर उत्पन्न होणाऱ्या दुसऱ्या विकारालाही उदर्क म्हणावे, असे काही टीकाकारांचे मत आहे परंतु ते योग्य नाही.

→ उपद्रव हा व्याधी आहे व एक व्याधी उपस्थित असतांना त्याची उत्पत्ती होते. उलट व्याधी बरा झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या लक्षणांना उदर्क म्हटले जाते.

• उपद्रव व व्याधिअवस्था संबंध

→ व्याधिअवस्था ह्या व्याधीच्या उत्तरकाळात उत्पन्न होतात व त्या मुळ व्याधीच्या आश्रयाने असतात. परंतु त्यांना निराळा व्याधी असे कधीही संबोधले जात नाही.

→ उपद्रव - हा निराळा व्याधी आहे. उपद्रव व मुळ व्याधी यांना उत्पन्न करणारा दोष एकच असला तरी, त्यांचे अधिष्ठान व व्यक्तिस्थान भिन्न असतात.

→ व्याधि अवस्था म्हणजे मुळ व्याधीत उत्पन्न होणारी विशिष्ट लक्षणे.

→ व्याधी अवस्था निश्चितपणे उत्पन्न होतात. पण उपद्रव नेहमी उत्पन्न होईलच असे नाही.
उदा - बलवान दोषज शोथाची उपेक्षा केली तर व्रणावस्था निश्चित उत्पन्न होईल. मात्र उपद्रव होईलच असा नियम नाही.
→ परंतु प्रत्येक रोगातील सर्व अवस्था ...

अरिष्ट

व्याख्या -
① ज्या लक्षणांद्वारे भविष्यकालीन मृत्युचे ज्ञान होते, त्यांना 'रिष्ट/अरिष्ट' म्हणतात.

② निश्चित मृत्युसूचक लक्षणांनाही 'अरिष्ट' म्हणतात.

③ शरीर व मनाच्या प्रकृतिमध्ये व इंद्रियांच्या स्वाभाविक गुणधर्मात जर कोणत्याही विशिष्ट कारणाशिवाय विकृत बदल उत्पन्न झाला तर त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या सर्व लक्षणांना अरिष्ट मानावे.

★ अरिष्टसूचक लक्षणे -
(i). व्याधी आभ्यंतर, शाखा व मध्यम अशा तीनही मार्गात पसरतो.
(ii). प्रकुपित दोष सर्व शरीर व्यापतात.
(iii). कोणत्याही औषधी उपक्रमांनी व्याधीचा थोडा देखील प्रशम होत नाही
यावेळी अरिष्टसूचक लक्षणे उत्पन्न होतात.

• अरिष्टाभास -
व्याख्या - क्वचित अरिष्टासमान लक्षणे दिसूनही, रुग्णाला मृत्यु येत नाही. अशा वेळी त्या लक्षणांना अरिष्टाभास लक्षणे म्हणावे.

• विशिष्ट रिष्ट/अरिष्ट लक्षणे -

(i) श्रवणेन्द्रियविप्रतिपत्ती - ज्यांची श्रवणशक्ती अकस्मात नष्ट होते. जो शत्रुच्या शब्दांच्या विश्वास ठेवतो व मित्रांवर अविश्वास. ज्याला ऐकु न येणारे शब्द कळतात.
(ii) स्पर्शनेन्द्रियविप्रतिपत्ती - जो शीत पदार्थाला उष्ण व उष्णाला शीत समजतो, ज्याला आघातजन्य व्रण होऊनही वेदना कळत नाही.
(iii) रूपविप्रतिपत्ती - शरीरावर धूळ, राख नसूनही ज्याला ती असल्याप्रमाणे वाटते, ज्याच्या शरीराचा वर्ण अकस्मात बदलतो.
(iv). रसनेन्द्रियविप्रतिपत्ती - विपरीत रसज्ञान होणे.
(v). घ्राणेन्द्रियविप्रतिपत्ती - ज्याला सुगंधाचा दुर्गंध व दुर्गंधाचा सुगंध येतो.

Date
Page

• अरिष्ट लक्षणांच्या विकृतीचे प्रकार -

(i). लक्षणनिमित्ता विकृती -

पूर्वजन्माच्या कर्मानुसार अरिष्टलक्षणे उत्पन्न होतात.

→ ही लक्षणे दोषानुरूप असतात, कधी.

→ तर कधी दोष व व्याधी यांच्याशी आजिबात संबंध ठेवत नाहीत. उदा - नखावर कमळाप्रमाणे विविध आकृती उत्पन्न.

(ii). लक्ष्यनिमित्ता विकृती -

→ कार्यकारण संबंध समजल्याने लक्षणोत्पत्तीचा हेतू स्पष्ट होतो.

→ ही लक्षणे निदान - पूर्वरूप - रूप - संप्राप्ती - दोष - दूष्य यांच्या बलाबलांवर अवलंबून असतात.

→ उदा - राजयक्ष्मात शरीराची कांती पूर्ववत होते, परंतु बल, मांसक्षय वाढतो.

(iv). निमित्तानुरूप विकृती -

→ हे भाव हेतुरूप नसतात. हे हेतुरूप बनल्याने जी विकृती उत्पन्न होईल त्याला निमित्तानुरूप विकृती म्हणतात.

→ उदा. - रूक्ष, लघु, शीत, खर हे गुण वातवर्धक आहेत. हे वातघ्न गुण बनले तर ती निमित्तानुरूप विकृती होईल.

Scanned with CamScanner